# महाराष्ट्र विधानपरिषद

# दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत प्रॉपर्टी टायटल सर्टिफिकेशन सिस्टम ही प्रणाली राबविणेबाबत

**(१) ९९९ (१८-१२-२००९). ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत प्रॉपर्टी टायटल सर्टिफिकेशन सिस्टम ही प्रणाली मध्ये राबविण्यात यावी असे केंद्र शासनाने माहे जुलै, २००९ वा त्यादरम्यान राज्य शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रॉपर्टी अंमलात आणल्यास किती खर्च अपेक्षित आहे व त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वातील ऐच्छिक सुधारणांमध्ये प्रॉपर्टी टायटल सर्टिफिकेशन सिस्टम ही प्रणाली अंमलात आणण्याचे विहित केले आहे, हे खरे आहे.

(२) सदर सुधारणांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :-

- नवीन नोंदणी प्रणाली, राज्य हमी आणि कायदेविषयक सुधारणा यावर निर्णय घेणे.
- शिर्षकाची नोंदणी करणे.
- राज्य मालकीच्या मालमत्ता नोंदणीचे संगणकीकरण व मालमत्ता नोंदणीचे १००% लक्ष्यसाध्य करणे.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल नियमांमध्ये प्रॉपर्टी टायटल सर्टिफिकेटची तरतूद आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत विहित केलेल्या सदर सुधारणांची अंमलबजावणी राज्य शासनाने यापूर्वीच केली असल्याने त्यावर नव्याने खर्च करण्याची आवश्यकता नाही.

---

## मंजूर अर्थसंकल्प लागू करणे अशक्य असल्याची आयुक्त यांनी घेतलेल्या भूमिकेबाबत

**(२) ४४५० (०९-०४-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई प्रांतिक अधिनियमाच्या कलम ९५ प्रमाणे आयुक्त अर्थसंकल्प सादर करीत असतात, परंतु अर्थसंकल्पात सूचविलेली ६०० कोटींची वाढ उत्पन्न कमी असल्याने ती स्वीकारता येत नसल्याने मंजूर अर्थसंकल्प लागू करणे अशक्य असल्याची भूमिका आयुक्त यांनी घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील सभागृहातील लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्त यांनी अर्थसंकल्प सादर करताना २९५ कोटींची थकीत देणी लपविली असल्याचा आक्षेप घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) अशा प्रकारच्या रुपये ६०० कोटीच्या वाढीची मागणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे करण्यात आलेली नाही.
(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेला मुंबई प्रांतिक अधिनियम लागू होत नसून, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदी लागू होतात.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील लेडीज बारची पाहणी करण्याबाबत**

**(३) १८८९७ (२८-०४-२०१६). ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील लेडीज बारची पाहणी करुन कारवाई करण्याबाबत दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात महापालिकेने स्वतंत्र पथक निर्माण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पथकाने केलेल्या पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१८) :** (१) नाही. तथापि, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण यांनी त्यांच्या दिनांक २५/०७/२०१४ च्या पत्रान्वये बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याबाबत विनंती केली होती.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर पथकाकडून पाहणी करण्यात आलेल्या कोणत्याही बारमध्ये छुप्या खोल्या / चोरकप्पे असल्याचे प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी आढळून आले नाही.

---

## राज्यातील कारागृहात कैद्यांना ठेवण्याची क्षमता वाढविणेबाबत

**(४) २०२१२ (२३-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १५१९८ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील आधारवाडी कारागृहाची क्षमता ५०५ पुरुष व ३५ महिला कैदी अशी एकूण ५४० कैद्यांची असताना प्रत्यक्षात १३८६ पुरुष आणि ९२ महिला कैदी असे एकूण १४७८ म्हणजेच कारागृह क्षमतेच्या तिप्पट कैद्यांना या कारागृहात ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोजा येथे २५०० कैदी क्षमतेचे नवीन मोठे कारागृह बांधलेले असून त्याठिकाणी फक्त मुंबईतीलच काही कैदी वर्ग केले असून आजमितीस मुख्य नागरी वस्तीत असलेल्या आधारवाडी कारागृहाच्या क्षमतेपेक्षा अधिक कैद्यांना तळोजा कारागृहात वर्ग करण्याबाबत शासन विनाविलंब कोणती कार्यवाही करणार आहे,

(३) तसेच, राज्यातील कारागृहे आणि सुधारगृहे आरोपींनी भरली असल्याने जादाच्या पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांना ठेवण्यासाठी कारागृहे आणि महिला सुधारगृहात जागा नसल्याने कारागृह आणि महिला सुधारगृहांच्या अधिक्षकांनी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बालसुधारगृहे व कारागृहे यांची क्षमता वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) मुंबई परिसरातील कारागृहांमध्ये गर्दी झाल्यामुळे मुंबई, ठाणे मध्यवर्ती कारागृहे व कल्याण जिल्हा कारागृहांमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या बंद्यांचा प्रवेश काही कालावधीसाठी बंद करुन सदर बंद्यांना तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे वर्ग करण्याची कार्यवाही मा.न्यायालयाच्या सहमतीने व कारागृह उपमहानिरीक्षक आदेशानुसार करण्यात येत आहे. माहे जानेवारी २०१७ अखेर कल्याण जिल्हा कारागृहातील ९४१ बंदी तळोजा कारागृह येथे वर्ग करण्यात आले असून, बंदी वर्ग करण्याची प्रक्रिया निरंतर सुरु असते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औरंगाबाद महापालिकेतील ग्रुप हौसिंग योजनेतील गैरप्रकाराबाबत

**(५) २१७८६ (२३-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सन २००७-२००८ या वर्षी शहरी भागात ग्रुप हौसिंग योजना जाहिर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत औरंगाबाद शहरात २५० ते ३०० वसाहतीची कामे झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसाहतीसाठी गैरमार्गाने बांधकाम परवानग्या दिल्या व विकासकाने या वसाहतीमध्ये कोणत्याही सोई-सुविधा दिल्या नाहीत व महापालिकेने कोणत्याच प्रकारचा विकास निधी न घेता या वसाहतीमध्ये नियमबाहृय विकासाची कामे करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) गृहनिर्माण विभागामार्फत अशी योजना जाहीर करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वारजे (जि.पुणे) येथील तिरुपतीनगर जवळ वाचनालय सुरु करण्याबाबत**

**(६) २५११९ (१६-१२-२०१६). ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वारजे (जि.पुणे) येथील तिरुपतीनगर जवळ लाखो रुपये खर्च करुन वाचनालयाची प्रशस्त इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ पासून या इमारतीकडे दुर्लक्ष करण्यात येवून त्याठिकाणी वाचनालय अद्यापही सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर इमारतीत वाचनालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर ग्रंथालयाच्या इमारतीकडे दुर्लक्ष झाले आहे अशी वस्तुस्थिती नाही. सदर इमारत वाचनालयासाठी संयुक्त प्रकल्प तत्वावर देण्याचे प्रायोजन होते. तथापि, स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशामुळे या इमारतीत लाईट हाऊस प्रकल्प राबविण्याचे काम पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनेक विकासकांनी अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (एफएसआय) म्हाडाला सुपूर्द केले नसल्याबाबत

**(७) २८०७१ (१३-०४-२०१७). प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयंत पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाद्वारे शहरात उत्तुंग टावर्स उभारणाऱ्या अनेक विकासकांनी यातून निर्माण होणारे हजारो कोटींचे अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (एफएसआय) सदनिकांच्या स्वरुपात म्हाडाला अद्यापपर्यंत सुपूर्द केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकासकांनी अतिरिक्त चटई क्षेत्रफळासाठी म्हाडाकडून रुपये सहा हजार कोटी घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव चटई क्षेत्रफळासाठी किती विकासकांनी अतिरिक्त चटई क्षेत्रफळ देण्याचे प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले होते व त्यापैकी किती विकासकांनी अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (सदनिका) दिलेल्या आहेत व किती विकासकांनी अतिरिक्त चटईक्षेत्रफळ (सदनिका) दिलेल्या नाहीत,

(४) असल्यास, अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (सदनिका) परत मिळविण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, विकासकांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी अतिरिक्त चटई क्षेत्रफळ (सदनिका) परत मिळविण्याकरीता शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) असल्यास, म्हाडाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हे सर्व प्रकार घडत असल्याने अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता (०५-०४-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे सन २०११ मध्ये ज्या योजनांमध्ये अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ विकासकांकडून देय होते. अशा योजनांची संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता असे आढळून आले की, एकूण ३३ विकासकांनी योजना पूर्ण केल्या परंतु म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाही. या कारणास्तव मंडळाने २९ विकासकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात तसेच आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात रितसर गुन्हे नोंदविले आहेत. तसेच सन २०१७ मध्ये मंडळाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पुन्हा योजनांची पाहणी करुन ०५ विकासकांविरुध्द गुन्हे अन्वेषण विभागात गुन्हा नोंदविलेला आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सन २०११ मध्ये २९ विकासकांविरुध्द गुन्हे अन्वेषण विभागात रितसर गुन्हे नोंदविले आहेत.

मंडळाने २९ विकासकांविरुध्द गुन्हे नोंदविल्यानंतर शासनाने दिलेल्या निर्देशानुसार ०७ विकासकांनी दंडनिय रक्कम रुपये ६.४० कोटी मंडळाकडे भरणा केली आहे. तसेच सद्य:स्थितीत १४ विकासकांनी एकूण ६४२०.५७ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपूर्द केले आहे (६३७६.१२ चौ.मी. + ४४.४५ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळापोटी रोख रक्कम रुपये १,३२,०८,८३७/- मंडळास प्राप्त). उर्वरित प्रकरणांमध्ये देय अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ ८१२२.६८ चौ.मी. अद्यापपर्यंत विकासकाने मंडळास हस्तांतरीत केलेले नाही व दंडात्मक रक्कम मंडळास दिलेली नाही, त्यांच्या विरुध्द गुन्हा अन्वेषण विभागाने मा.अतिरीक्त महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई येथे दोषारोप पत्र दाखल केली आहेत व सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(३) अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळापोटी १५४ पेक्षा जास्त योजनांमध्ये विकासकाने मंडळास एकूण ५०५२८.९० चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपूर्द केले आहे. तसेच ३१४३.८० चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळापोटी विकासकाने रक्कम रुपये ४१.९१ कोटी मंडळास भरले आहे.

मंडळाने सन २०११ मध्ये ज्या २९ विकासकांविरुध्द गुन्हे अन्वेषण विभागाकडे गुन्हे नोंदविले होते. त्यापैकी अद्याप १४ विकासकांनी म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपूर्द केलेले नाही.

(४) व (५) वर नमुद केल्याप्रमाणे, विकासकांनी मंडळाची फसवणुक केल्यामुळे, दोषी विकासकांविरुध्द मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हे अन्वेषण विभागाकडे गुन्हे नोंदवून आवश्यक ती कार्यवाही केली आहे. तसेच विकासकाविरुध्द गुन्हा अन्वेषण विभागाने मा.अतिरीक्त महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई येथे दोषारोप पत्र दाखल केली आहेत,

तसेच ज्या विकासकांनी अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळाकडे सुपूर्द केलेले नाही, अशा सर्व विकासकांची स्थावर अथवा जंगम मालमत्तांबाबतची माहिती सह उपनिबंधक-मुंबई शहर, जिल्हाधिकारी-ठाणे, शहर आणि उपनगरे व विकासकांच्या बँक खात्याबाबतची माहिती रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात येत आहे व सदर माहिती संकलित झाल्यानंतर, मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे महसूल पुर्नप्राप्ती साठी (Revenue Recovery Certificate) देण्यात येणार आहे. तद्नंतर विकासकांची मालमत्ता जप्त करुन, लिलावात काढण्याचे प्रस्तावित आहे व त्यामधुन प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून मंडळास देय असलेल्या अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळाची वसुली करण्यात येईल. तसेच अश्या विकासकांचे महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अखत्यारीत सुरु असलेल्या इतर पुनर्विकास योजनांना कामे थांबविण्याचे निर्देश देण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच शासनाची मंजूरी घेऊन सदर विकासकांना काळया यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. वर नमुद केल्याप्रमाणे, विकासकांनी मंडळाची फसवणुक केल्यामुळे, दोषी विकासकांविरुध्द मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हे अन्वेषण विभागाकडे गुन्हे नोंदवून आवश्यक ती कार्यवाही केली आहे.

मंडळाने वेळोवेळी अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ ताब्यात घेतले आहेत तसेच ज्या विकासकांनी बांधकाम क्षेत्रफळ देण्याचे टाळले आहे, त्यांच्याविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे वेळोवेळी कारवाई केली आहे व करीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे माजिवडा व नौपाडा (जि.ठाणे) येथील भूखंडावर महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे निवासस्थान बांधण्याबाबत

**(८) ३३५८३ (८-०१-२०१३) श्री.हेमंत टकले,श्री.विक्रम काळे. :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माजिवडा (जि.ठाणे) येथील सर्वे नं. १०३ च मौजे नौपाडा सी.टी.एस.नं.१४६३/१४६४ ह्या भूखंडावर महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे निवासस्थान बांधण्याबाबतच्या मागणीचे निवेदन मा.मुख्यमंत्री, आयुक्त, महानगरपालिका ठाणे आदिंना तसेच अध्यक्ष, साई दुर्गा मेहत्तर समाज मागासवर्गीय सामाजिक संस्था, वर्तकनगर, ठाणे यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०११ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व निर्णय केव्हा घेण्यात येईल ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अध्यक्ष, साईदुर्गा मेहत्तर समाज मागासवर्गीय सामाजिक संस्था, वर्तकनगर यांनी मौजे माजिवडा येथील सर्वे नं. १०३ व मौजे नौपाडा येथील सी.टी.एस. नं. १४६३/१४६४ या भूखंडावर महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे निवासस्थान बांधण्याबाबतची मागणी दिनांक १०/११/२०१० रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे केली होती.

(२) व (३) अध्यक्ष, साईदुर्गा मेहत्तर समाज मागासवर्गीय सामाजिक संस्था, वर्तकनगर यांनी मागणी केलेल्या मौजे माजिवडा येथील सर्वे नं. १०३ व मौजे नौपाडा येथील सी.टी.एस.नं. १४६३/१४६४ हे भूखंड खाजगी मालकीचे आहेत. तसेच ठाणे शहराच्या मंजूर सुधारित विकास आराखड्यानुसार या भूखंडावर विकास प्रस्ताव मंजूर करण्यात आल्यामुळे हे भूखंड सदर संस्थेस देता येणार नसल्याचा निर्णय ठाणे महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.

तथापि ठाणे महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत पात्र सफाई कामगारांना माजिवडा (सेक्टर क्रमांक २ स.नं. ५३/१, ५३/२) व भाईंदर पाडा (सेक्टर क्रमांक ६, स.नं. २७ ही. नं. २ ब) येथे एकूण २९० सदनिका बांधल्या आहेत

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## अंबरनाथ (पूर्व)(जि.ठाणे) येथे शासकीय भूखंडावर धार्मिक स्थळांचे बांधकाम केल्याबाबत

**(९) ३३९५८ (११-०८-२०१७). श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (पूर्व) (जि.ठाणे) येथे डीडी स्कीम नं.५५ अंतर्गत शासकीय भूखंडाचे वाटप अनेक गृहनिर्माण संस्थाना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी केले असून सदरहू ठिकाणी महाराष्ट्र नगरविकास कायदयानुसार उदयानांसाठी राखीव असलेल्या अनेक भूखंडावर धार्मिक स्थळांचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूखंड वाटप करताना उदयानांसाठी राखीव असलेल्या भूंखडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अशी अट भूखंड वाटपाच्या आदेशामध्ये असतानाही शर्तभंग केल्याप्रकरणी किती गृहनिर्माण संस्थावर कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उदयानांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर धार्मिक स्थळांचे बांधकाम केलेल्या गृहनिर्माण संस्था किती आहेत,

(४) असल्यास, अशाप्रकारे धार्मिक स्थळांचे बांधकाम केलेल्या भूखंडाऐवजी पर्यायी भूखंड वाटप करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) अंबरनाथ (पूर्व) (जि.ठाणे) येथे महसूल विभागाने तयार केलेल्या जिल्हा विकास योजना (डीडी स्कीम नं. १५) अंतर्गत नगरपरिषद क्षेत्राच्या १७ टक्के क्षेत्र समाविष्ट केले असून अनेक गृहनिर्माण संस्थांना भुखंड वाटप केले आहे. उक्त ले - आऊट मधील खुल्या

जागेत धार्मिक स्थळाचे बांधकाम झाले असले तरी, न्यायालयीन आदेशानुसार सदर बांधकाम निष्कासित करण्यात आल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) उदयानांसाठी राखीव असलेल्या भूंखडावर ३ गृहनिर्माण संस्थेंमार्फत धार्मिक स्थळाचे बांधकाम झाल्याचे नगरपरिषद प्रशासनास निदर्शनास आले होते.

शासकीय भुखंडाचे वाटप, भुखंडाबाबत अटी व शर्ती तसेच शर्तभंगाबाबत कारवाई किंवा पर्यायी भुखंडाची वाटप व्यवस्था इत्यादी संदर्भात निर्णय महसूल विभागाच्या अखत्यारीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे नगरपरिषद अंतर्गत अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत**

**(१०) ३४६४५ (१५-०९-२०१७). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ११६८५ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषद अंतर्गत स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामाबाबत नगरपरिषदेने नगर रचनाकार, रत्नागिरी यांचेकडे पाठविलेल्या प्रकरणांची खातरजमा करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामे पाडण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१८) :** (१) व (२) शहरातील अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चिपळूण नगरपरिषदेने संबंधितांना अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नोटीस बजाविली आहे.

सदर बजावण्यात आलेल्या नोटीशीविरुध्द संबंधितांनी मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून सदर बाब सद्य:स्थितीत न्याय प्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माहिती अधिकार कार्यकर्ता माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर करत असल्याबाबत

**(११) ३५१७२ (०४-०१-२०१८). डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील आदिवासी विकास भवन येथे शासकीय कामासाठी आलेल्या महिरवणी (जि.नाशिक) येथील आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री.नवनाथ वाघ यांना कथित माहिती अधिकार कार्यकर्ता प्रविण महाजन यांनी दमदाटी करून मारहाण केली तसेच विनयभंगाची खोटी तक्रार दाखल करण्याची धमकी दिल्याचे दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रविण महाजन यांचेविरुध्द मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक येथे भा.दं.वि. ३५३,३३२,३२३,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दाखल गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय व माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर करून शासकीय कार्यालयांना वेठीस धरणाऱ्या महाजन यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, यापुर्वीही नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्तालयातच माहिती अधिकार कायद्याच्या नावाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने मद्यधुंद अवस्थेत प्रविण महाजन याने गोंधळ घालून शिवीगाळ केल्याचा प्रकार दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित प्रविण महाजन हा कथित संघटनांच्या नावाने विविध शासकीय-निमशासकीय आस्थापना/संस्था/शिक्षण संस्था व उपक्रमांचे ठिकाणी गैरमार्गाने मोठ्या संख्येने माहितीचे अर्ज करून माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर करत असल्याचे या प्रकारातुन निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महाजन यांचेकडून माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर होत असल्याबाबत तपास करण्यात आला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यांचेविरुध्द कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) व (२) मुंबईनाका पोलीस ठाणे येथे श्री.नवनाथ वाघ यांचे तक्रारी वरुन गुरनं १८९/२०१७ भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे श्री.प्रविण महाजन यांचेविरुध्द गुन्हा दाखल असून, गुन्हयाचा तपास पूर्ण झाला आहे. सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) दिनांक २६/०४/२०१६ रोजी आदिवासी विकास भवन, नाशिक येथील उपआयुक्त व तेथील कर्मचारी यांनी प्रविण महाजन यांचे विरुध्द शासकीय कार्यालयात दारु पिवुन अधिकाऱ्यांना शिवीगाळ व दमबाजी केल्याबाबत गुन्हा दाखल करावा असा अर्ज केला होता.सदर अर्जाप्रमाणे लेखी फिर्याद देणेकामी हजर राहण्याबाबत दिनांक ०९/०५/२०१६ रोजी जा.क्र.९८८/१६ अन्वये पत्र उपआयुक्त, आदिवासी विकास भवन, नाशिक यांना देण्यात आले होते परंतु, ते अथवा त्यांचे कार्यालयातील कोणीही प्रतिनिधी लेखी फिर्याद देणेकामी पोलीस ठाणेस हजर न झाल्याने सदरचा अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला.
(६) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या बेरोजगार अभियंत्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(१२) ३५४०२ (०४-०१-२०१८). श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२०८ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील आझाद मैदान येथे उपोषणास बसलेल्या बेरोजगार अभियंत्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१८) :** (१) व (२) उपोषण दरम्यान मयत इसम आजारी पडल्याने दिनांक २८/०४/२०१७ रोजी गोकुळदास तेजपाल रुग्णालयात त्यास दाखल केले असता दिनांक ०६/०५/२०१७ रोजी त्यांचा मृत्यू झाला आहे. सदर प्रकरणात मयत इसमांचा मुलगा यांचा जबाब घेण्यात आला असता त्याने त्याचे वडील शेती करीत असल्याचे नमूद केले.

डॉक्टरांनी मयत इसमाचा मृत्यू नैसर्गिक असून खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत :-

अ) Cause of death Terminal Cardiorespiratory arrest due to type १, Respiratory failure due to Aspiration pnuemonits c/o Right MCA Territory infact with Parahippocampal herniation.

आ) Manner of Death- Natural

सदरहू प्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाणे येथे घटना नोंद क्र.४६/२०१७, दिनांक ०६/०५/२०१७ अन्वये घेण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नगरपरिषदांच्या आकृतिबंधात सुधारणा करण्याबाबत

**(१३) ३५८५७ (०४-०१-२०१८). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नगरपरिषदांचा आकृतिबंध सन २००५ मध्ये मंजूर झाला असून अस्थायी पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर सदर पद रिक्त होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदांच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर घट होते व त्याचा नगरपरिषदेच्या कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आकृतिबंधात सुधारित करणे व कर्मचारी भरतीबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील नगरपरिषदांचा आकृतिबंध सन २००५ मध्ये मंजूर झाला असून, अस्थायी पदावरील कर्मचारी सेवा निवृत्त/निधन झाल्यावर अस्थायी पद व्यपगत होत असते.

(२) हे खरे नाही.

अस्थायी पदे ही संबंधित कर्मचाऱ्यास नगरपरिषद सेवेत सामावून घेण्यासाठी एकवेळची विशेषबाब म्हणून निर्माण केले जाते. अस्थायी पदावरील कर्मचारी सेवा निवृत्त/निधन झाल्यावर अस्थायी पद व्यपगत होते. नगरपरिषदेच्या कामकाजासाठी स्थायी पदावरील कर्मचारी आहेत. त्यामुळे, नगरपरिषदांच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर घट होऊन कामकाजावर परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) दिनांक १२/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील राज्यस्तरीय संवर्ग पदांचा सुधारीत आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकुण १८८९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता संचालनालयाकडून दिनांक ०७/०४/२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार महापरीक्षा पोर्टल या यंत्रणेमार्फत दिनांक १८/०५/२०१८ ते दिनांक २३/०५/२०१८ या कालावधीत पूर्व परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

तसेच, दिनांक १३/०४/२०१७ च्या शासन निर्णयानुसार नगररचनाकार व विकास सेवा संवर्गातील एकुण ४५५ पदे नगररचना व मुल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील संबंधित संवर्गातील अधिकाऱ्यांमधून १००% प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेत भुयारी गटार योजनेच्या कामाबाबत

**(१४) ३५८७८ (०४-०१-२०१८). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेत भुयारी गटार योजनेचे सर्वेक्षण करण्याचे काम नगराध्यक्षांनी संदीप गुरव ॲण्ड असोशिएशन यांना दिले असून नगरसेवकांचा विरोध असूनही कलम ५८/२ अन्वये विशेष अधिकाराचा वापर नगराध्यक्षांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या कालावधीत ९८ लक्ष रुपयांचे देयक ठेकेदाराला अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी दोषी पदाधिकारी व अधिकारी यांची शासनाकडून चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१८)** : (१) चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेत भुयारी गटार योजनेचे सर्वेक्षण करण्याच्या कामाची निकड व तातडी लक्षात घेऊन तसेच लगतच्या कालावधीत चिपळूण येथे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर लागणारी आचारसंहिता या बाबी विचारात घेऊन चिपळूण नगराध्यक्षांनी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम २५ (२) अन्वये भुयारी गटार योजनेचे सर्व्हेक्षणाचे काम संदीप गुरव ॲण्ड असोशिएशन यांना दिले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(२) अशा प्रकारची तक्रार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.
(३) व (४) चिपळूण शहरामध्ये भुयारी गटार योजना राबविणे व सांडपाणी प्रक्रीया करणे याकरीता ठेकेदाराकडून सादर केलेल्या सविस्तर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मुख्यसभेच्या ठरावाद्वारे प्राप्त करुन घेऊन या कामांतर्गत करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार मंजूर टप्याप्रमाणे ठेकेदारास रुपये ९२.४८ लक्ष अदा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नगरपरिषदांमध्ये अनुकंपा तत्वावरील अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ३५८८४ (०४-०१-२०१८). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा असल्याने अनुकंपा तत्वावरील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणावर कार्यवाही करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

नगरविकास विभागाच्या नवि-२७ कार्यासनाच्या दिनांक २८/०९/२००० च्या शासन निर्णयान्वये राज्यातील नगरपरिषदांच्या आस्थापना खर्चाची मर्यादा "अ" वर्ग-५०%, "ब" वर्ग-५५%, "क" वर्ग-६०% याप्रमाणे निश्चित करून देण्यात आली आहे.

संचालनालयाने त्यांच्या दिनांक १५/०७/२०१० च्या पत्रान्वये मंजूर आकृतीबंधातील फक्त स्थायी पदांवर अनुकंपा नियुक्त करण्यासाठी आस्थापना खर्च मर्यादेची अट शिथील करण्यात आल्याबाबतच्या सूचना सर्व नगरपरिषदांना दिलेल्या आहेत. तथापि, राज्यातील नगरपरिषदांमधील अस्थायी पदांना अनुकंपा नियुक्ती देण्याबाबत आस्थापना खर्चाची मर्यादेसंदर्भात अट शिथील करण्याबाबत कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत.

(२) सामान्य प्रशासन विभागाने "अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/ परिपत्रक यांचे एकत्रिकरण" याबाबत दिनांक २१/०९/२०१७ अन्वये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार नगरपरिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका यांचेकडील कर्मचाऱ्यांना थेट लागू होणार नाहीत. त्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात सद्य:स्थितीत प्रशासकीय विभागाने कोणताही निर्णय घेतलेला नसल्याने, संचालनालयाच्या स्तरावरून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/०९/२०१७ नुसार कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेने सीआरझेड कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत**

**(१६) ३६०४४ (०४-०१-२०१८). श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३२७ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेने सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बेकायदा इमारतींचे बांधकाम केल्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त नगरपरिषदेने सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बेकायदा इमारतींचे बांधकाम केल्याबाबत सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ५९५३३ उपस्थित केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या उत्तरात जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे नमुद केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त चौकशी अहवालानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानसभा यांचेकडून अशा आशयाचे पत्र प्राप्त झालेले नाही. तथापि, ऑक्टोबर, २०१७ मध्ये मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद यांचे या आशयाचे पत्र प्राप्त झाले. हे खरे आहे.

(२) व (३) होय.

(४) व (५) जिल्हाधिकारी, पालघर यांच्यामार्फत डहाणू नगरपरिषदेच्या विविध बाबींच्या अनुषंगाने चौकशी करून त्याबाबत प्राथमिक अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

- सदर प्राथमिक अहवालातील मुद्यांमध्ये नगरपरिषदेने सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बेकायदा इमारतींचे बांधकाम केले असल्याच्या मुद्याचा देखील समावेश आहे.
- त्यामध्ये सन २०१३ ते २०१६ या कालावधीतील सर्व बांधकाम प्रकरणांची तपासणी सुरु असल्याचे नमूद केले आहे.
- त्यानुसार तपासणीची कार्यवाही जिल्हाधिकारी, पालघर यांच्या स्तरावर सुरू आहे.

---

**नाशिक स्मार्ट सिटी अभियानाकरीता विशेष उद्देश वाहन वर प्रतिनिधित्व मिळण्याबाबत**

**(१७) ३६१०२ (०४-०१-२०१८). श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी अभियानाकरीता विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वाहन वर प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी पदनिर्देशित संचालक म्हणून नियुक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महापालिकेतील इतर मान्यताप्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक या प्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशित करता येतील असे शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक १८ जून, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक स्मार्ट सिटी अभियानाकरीता विशेष उद्देश वाहन संचालक म्हणून नामनिर्देशित करण्याकरीता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या राजकीय पक्षांनी दिनांक १७ जून, २०१७ व दिनांक २० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास महापौर, नाशिक महानगरपालिका यांना लेखी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग क्र. (२) बाबत नाशिक महापालिकेकडून कार्यवाही न केल्यामुळे गटनेत्यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी व दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार नाशिक मुन्सिपल स्मार्ट

सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. च्या संचालक मंडळ अध्यक्षांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मार्गदर्शक निर्देशानुसार रिक्त संचालकांची नेमणूक करण्याबाबत तसेच विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याबाबत नाशिक महानगरपालिकेने केलेला ठराव हा शासन निर्णयाशी विसंगत असल्या कारणाने सदर ठराव राज्य शासनाकडून प्रथमत: निलंबित करण्यात आला होता.

नाशिक महानगरपालिकेने यासंबंधी माहे मार्च २०१८ मध्ये नव्याने ठराव संमत करून स्मार्ट सिटी संबंधित असलेल्या शासन निर्णयाप्रमाणे दोन सदस्यांचे नामनिर्देशन विशेष उद्देश वाहनावर केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे-कुर्ला संकुलात भाडेपट्टयावर घेतलेल्या भूखंडाचा विकास करण्याबाबत

**(१८) ३६२१८ (०४-०१-२०१८). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वांद्रे-कुर्ला संकुलात भाडेपट्टयावर घेतलेल्या भूखंडाचा विकास करण्यास विलंब लावणाऱ्या रिलायन्स इंडस्ट्री, जमनाबेन हिराचंद अंबानी फाउंडेशन, तालीम रिसर्च फाऊंडेशन आणि नमन हॉटेल्स यांच्यावरील दंडात्मक कारवाई पोटीची कोट्यवधी रुपयांची थकबाकी वसूल करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कंपन्याकडे किती रक्कम थकीत आहे व त्यापैकी किती रक्कम माहे डिसेंबर, २०१७ अखेर वसूल केली जाणार आहे व अद्याप किती रक्कम थकीत आहे,
(३) असल्यास, उर्वरित रक्कम थकीत राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय. प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी ब्लॉकमधील खालील वाटप केलेल्या भूखंडावरील इमारतीचा बांधकाम पूर्णत्वाचा ४ वर्षांचा निर्धारित कालावधी बांधकाम पूर्ण न केल्यामूळे भूखंडाच्या वाटपग्रहींकडून अतिरिक्त अधिमूल्याचा भरणा बाकी आहे.

| भूखंड क्रमांक | वाटपग्रही संस्था | दिनांक ३०/११/२०१७ पर्यंतची थकबाकी रुपये (कोटी) |
|---|---|---|
| सी-६३ | इंडियन न्यूजपेपर सोसायटी | ५६.९१ |
| सी-६६ | मे. रिलायन्स इंडस्ट्रिज (इंडिया) लि. | ४४१.०८ |
| सी-६४ | मे. रिलायन्स इंडस्ट्रिज (इंडिया) लि. | १४२२.४९ |
| एस्.एफ.-७ आणि ९बी | जमनाबेन फाऊंडेशन | २४.०९ |
| एस्.एफ-६ | तालीम रिसर्च फाऊंडेशन | १६.०७ |
| सी-५७ आणि ५८ | नमन हॉटेल | ३२.६८ |

सबब, सदर अधिमूल्य भरणा करणेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी रिझम्पशनची नोटीस (भूखंड परत घेण्याची) या वाटपग्रहींनी दिलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिलेल्या रिझम्पशनच्या नोटीस (भूखंड परत घेण्याची) विरोधात मेसर्स रिलायन्स इंडस्ट्रिज (इंडिया) लि., मेसर्स नमन हॉटेल व मेसर्स इंडियन न्यूजपेपर सोसायटी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## नाशिक शहरात गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(१९) ३६२८८ (०४-०१-२०१८). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात खुन, चैन स्नॅचिंग, जबरी चोऱ्या, खंडणी, मारहाण व घरफोड्यांचे गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून माहे जानेवारी, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत चेन स्नॅचिंगचे ७३ गुन्हे, दिवसा घरफोडीचे ४२ गुन्हे, रात्रीच्या घरफोडीचे १७७ गुन्हे, चोरीचे ३०४ गुन्हे, वाहन चोरीच्या ४०७ घटना घडल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ४३ टक्के गुन्ह्यांचा तपास लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांच्या तुलनेत शोध व चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे प्रमाण नगण्य असल्याने जनतेत भितीचे वातावरण निर्माण झाले असून नाशिक शहर व परिसरातील गुन्ह्यांना आळा घालण्याच्या अनुषंगाने शासनाने गुन्हेगारांविरुध्द कोणती प्रतिबंधात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) नाशिक शहरात खून, चैन स्नॅचिंग, जबरी चोऱ्या, खंडणी, मारहाण व घरफोड्यांचे गुन्हयांबाबतची माहीती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | शिर्षक | १ जाने. २०१६ ते१५ ऑग. २०१६ | | | १ जाने. २०१७ ते १५ ऑग. २०१७ | | | वाढ/ घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | टक्के | दाखल | उघड | टक्के | |
| ०१ | खून | २८ | २८ | १००% | २८ | २६ | ९२% | ० |
| ०२ | चैन स्नॅचिंग | ७७ | २० | २६% | ७३ | ३४ | ४७% | -४ |
| ०३ | खंडणी | १२ | १२ | १००% | २१ | २१ | १००% | ९ |
| ०४ | मारहाण | १९४ | १८४ | ९५% | १७३ | १६७ | ९७% | -२१ |
| ०५ | इतर जबरी चोरी | ५९ | २९ | ४९% | ६५ | २३ | ३५% | ६ |
| ०६ | दिवसा घरफोडी | ३१ | ८ | २६% | ४२ | ८ | १९% | ११ |
| ०७ | रात्री घरफोडी | १४३ | ४० | २५% | १७७ | ४२ | २४% | ३४ |
| ०८ | इतर चोरी | २९५ | ८८ | ३०% | ३०४ | ६७ | २२% | ९ |
| ०९ | मोटार वाहन चोरी | ३८२ | ७८ | २१% | ४०७ | ८१ | २०% | २५ |

(२) जानेवारी ते जून पावेतो भाग १ ते ५ चे १७४७ गुन्हे दाखल असून ९९९ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. उघडकीस येण्याचे प्रमाण पाहता ५७ टक्के आहे. तसेच भाग-६ चे एकुण ९७५ गुन्हे दाखल असून ९५१ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

(३) अशा घटनांना प्रतिबंध घालणेकरीता नाकाबंदी, झोपडपट्टी सर्वे चेकिंग/सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, पायी पेट्रोलींग, जनतेशी संपर्क साधुन सुरक्षिततेच्या तसेच सर्तकतेच्या सुचना देण्यात येतात. मोहल्ला कमिटी/शांतता समिती बैठक, सोसायटी मिटींग/ कॉर्नर मिटींगचे आयोजन करुन जनजागृती करण्यात येते. तसेच रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचेवर पाळत ठेवुन, गुप्त बातमीदार यांचेशी वेळोवेळी संपर्कात राहुन, त्यांचेकडुन उपयुक्त माहिती मिळवुन प्रतिबंध कारवाई करण्यात येते. तसेच मोटार वाहन चोरी

संदर्भात नाकाबंदी, वाहनांचे तपासण्या करणेबाबत सुचना देण्यात येतात. तसेच संशयित वाहने पो.स्टे. ला जमा करुन, कागदपत्रे मागवुन खातरजमा केली जाते. वाहन बाजारात विक्रीस ठेवलेले वाहने खरेदी/विक्री करणारे तसेच, अध्यक्ष भंगार असोसिएशन नाशिक यांना चोरी वाहनाचे खरेदी विक्री बाबत संशयित आढळल्यास पोलीस स्टेशनला कळविणेबाबत नोटीस देणे बाबत कळविण्यात येते. घरफोडी व चैन स्नॅचिंग संदर्भात सरप्राइज चेकिंग करुन, संशयित सराईत गुन्हेगार व रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्या घरझडत्या घेवुन, त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवणेबाबत कळविण्यात येते.

(४) कोणताही विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील महानगरपालिका रुग्णालयात औषधांचा पुरवठा करण्याबाबत**

**(२०) ३६३४२ (०४-०१-२०१८). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका रुग्णालयात मोठ्या प्रमाणात औषधांचा तुटवडा असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील महानगरपालिका रुग्णालयात औषधांचा पुरवठा पुरेशा प्रमाणात करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१८)** : (१) व (२) राज्यातील महानगरपालिकांकडून प्राप्त माहितीनुसार बृहन्मुंबई, नवी मुंबई, पुणे, सोलापूर, लातूर वगळता अन्य महानगरपालिकांच्या रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झालेला नाही.

सन २०१६-१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत ई-प्रणाली अद्यावत करण्याचे काम सुरु असल्याने निविदा प्रक्रियेस उशीर झाला होता.यास्तव मागील निविदाकाराकडून ३ महिन्यांचा औषध साठा करण्याविषयी सूचना महानगरपालिकेमार्फत देण्यात आल्या होत्या. या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत महानगरपालिकास्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकांतर्गत अत्यावश्यक सर्व औषधे उपलब्ध होती. उर्वरित काही औषधे पुरवठा आदेश देवुनही प्राप्त न झाल्याने रुग्णसेवेवर परिणाम होऊ नये यासाठी आवश्यकतेनुसार दरपत्रकानुसार खरेदी करुन औषधांची उपलब्धता करुन घेण्यात आली.

पुणे महानगरपालिकांतर्गत माहे ऑगस्ट, २०१७ च्या दरम्यान काही औषध साठा संपुष्टात आला होता.तथापि, सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षाकरीता निविदा प्रक्रिया करुन माहे ऑगस्ट, २०१७ च्या पहिल्या आठवड्यापासून औषधांचा पुरवठा सुरळीत केला आहे.

सोलापूर शहरात डेंग्युसदृष्य आजार व मलेरीयाचे रुग्ण आढळल्याने स्थानिक ठेकेदारांच्याकडून रुपये ५ लक्ष रक्कमेच्या औषधांची खरेदी करण्यात आली आहे.

लातूर महानगरपालिकांतर्गत आवश्यकतेनुसार स्थानिक स्तरावर औषध खरेदी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांबाबत

**(२१) ३६३७३ (०४-०१-२०१८). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील आतापर्यंत मंजूर असलेल्या ३५०० झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणा अंतर्गत परवानगी देण्यात आलेल्या पुनर्विकास योजनेतील अनेक योजना वर्षानुवर्षे कार्यान्वित होऊ न शकल्यामुळे मा.मुख्यमंत्र्यांनी शिवशाही पुनर्वसन कंपनी पुनर्जिवित केल्यानंतर विकासकांना थेट अर्थ सहाय्य देण्याची योजना असफल झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांना स्टेट बँक ऑफ इंडियाकडून अर्थ सहाय्य देण्याची नवीन योजना विकासकांसाठी सुरु करण्यात आली असल्याची जाहिरात स्टेट बँक प्रशासनाने देऊन विकासकांकडून प्रस्ताव मागविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांचे काम सुरु झाले आहे व याबाबत सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता (२४-०५-२०१८) :** (१) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचे कामकाज संस्थापनेपासून चालू असल्याने पुनर्जीवित झाली असे म्हणणे वैधानिकदृष्टया योग्य नाही. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून ऑक्टोबर १९९९ पर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी थेट अर्थसहाय्य देण्यात आले होते. सदर अर्थसहाय्याची संपूर्ण रक्कम तत्कालीन समायोजित व्याजासह एप्रिल २००७ पर्यंत वसूल करण्यात आलेली आहे. तद्नंतर शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून थेट अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर योजना असफल होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने आणि योजनांतील विकासकांच्या वाटयाच्या विक्री घटकात विकासकांनी ३० चौ.मी. पर्यंत आणि ३० ते ६० चौ.मी. पर्यंतच्या चटई क्षेत्रफळाच्या व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे परवडणाऱ्या घरांच्या किंमतीच्या मर्यादेत बृहन्मुंबईत विक्री करण्यास प्रवृत्त करण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून स्टेट बँक ऑफ इंडियाशी काही अटींसह सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सदर सामंजस्य करार मुख्यत: राष्ट्रीयकृत बँकेच्या धोरणाच्या अधिनस्त असून स्टेट बँक ऑफ इंडियाकडून विकासकांचे प्रस्ताव मागविण्याची जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने एकूण ८ प्रस्ताव प्राप्त झाले असून प्राप्त प्रस्तावांची छाननी चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पातूर (जि.अकोला) नगरपरिषद सफाई विभागातील पदास मंजूरी देण्याबाबत

**(२२) ३६४५० (०४-०१-२०१८). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (जि.अकोला) नगरपरिषद सफाई विभागात फक्त २३ सफाई कामगार कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००८ मध्ये पातूर नगरपरिषदेकडून नवीन १७ सफाई कामगार पदांची पद निर्मिती करून मंजूरी करीता प्रस्ताव नगररचना संचालक, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नगरपरिषद सफाई विभागात नवीन १७ सफाई कामगारांचे पद निर्मिती करून मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी अकोला यांचेमार्फत नवीन १७ सफाई कामगार पदनिर्मितीचा प्रस्ताव संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना सादर करण्यात आला आहे. संचालनालय स्तरावर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रोळी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या आकस्मिक मृत्यूबाबत

**(२३) ३६७५५ (०४-०१-२०१८). श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानसिक छळामुळे विक्रोळी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर खरे ज्यांना नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील उल्लेखनीय सेवेबद्दल उत्कृष्ट कार्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते त्यांचा आकस्मिक मृत्यू झाल्याबाबतची लेखी तक्रार त्यांच्या कुटुंबियांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलीस आयुक्त यांची भेट घेऊन देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१८) :** (१) होय.

(२) सदरहू प्रकरणी तात्काळ चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती सदर प्रकरणात वरीष्ठ पोलीस निरीक्षक हे दिवगंत सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मृत्यूस जबाबदार असल्याचे निष्पन्न होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गॅलेक्सी रेसिडेन्सी (ता.वसई, जि.पालघर) इमारतीतील अनधिकृत बांधकामाबाबत

**(२४) ३६९९४ (०४-०१-२०१८). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गॅलेक्सी रेसिडेन्सी (ता.वसई, जि.पालघर) हॉटेल व लॉज, वसंतनगरी, लिंकरोड वसई (पूर्व) यांना बांधकाम आराखड्यामध्ये ६ मजल्याची इमारत बांधण्याची परवानगी दिली असताना जीआर अधिक सहा असे वाणिज्य बांधकाम करुन हॉटेल व्यवसाय सुरु केला आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, उक्त प्रकरणी एम.आर.टी.अॅक्ट, १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यास प्रभारी सहायक आयुक्त दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) सदर इमारतीला ST+G+६ मजले अशी रहिवाशी इमारत म्हणुन बांधकाम परवानगी दिली आहे.

परंतु, जागेवर G+६ अशी इमारत आहे व वाणिज्य वापर चालु असून हॉटेल व्यवसाय केला जात आहे.

अनधिकृत बांधकामास प्रभाग कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आलेली आहे.

(२) उपरोक्त प्रमाणे विकासकांनी वरील तपशिलाचे नमुद ठिकाणी अनधिकृत बांधकाम करून जागेचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी विकासक व भोगवटा धारकांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत पोलीस ठाणे, तुळींज यांना गुन्हा दाखल करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेने दिनांक ०८/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयात मका खरेदी करणाऱ्या फसवणुकदारांनी फसविल्याबाबत

**(२५) ३७१४५ (०४-०१-२०१८). श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात मागील ४ महिन्यापासून १७ व्यापाऱ्यांकडून मका खरेदी करणाऱ्या फसवणुकदारांनी सुमारे १२ कोटी रुपयांना फसविल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार आतापर्यंत किती आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) व (२) होय.

या प्रकरणी क्रांतीचौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.२१२/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, १२०(ब) सह एम.पी.आय.डी. कायदा कलम ३ व ४ प्रमाणे १४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात फिर्यादी व इतर १७ व्यापाऱ्यांची व्याजासह एकूण १३,५७,३६,४४०/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. उक्त गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ५ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे व १ आरोपीस मा.न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. सदर प्रकरणी तपास चालु आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे क्रिमीनल याचिका क्र.५८८२/२०१७ दाखल असून यामध्ये फिर्यादी व इतर मका व्यापारी आणि आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेली आहे. त्यानुसार फसवणूकीची संपूर्ण रक्कम मे, २०१८ पर्यंत देण्यात येणार आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**भंडारा जिल्हा प्रशासनाने नगरपालिकेला दिलेल्या जागेच्या वापराबाबत**

**(२६) ३७२०३ (०४-०१-२०१८). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा (जि.भंडारा) येथील जलशुध्दीकरण केंद्राला लागून असलेल्या विस्तीर्ण जागेत प्रशस्त बगीचा व जलशुध्दीकरण केंद्राचा विस्तार याकरीता जिल्हा प्रशासनाने नगरपालिकेला दिड एकर जागा दिली होती परंतु, नगरपालिका प्रशासनाने ही जागा व्यक्तिगतरित्या बाजारासाठी दिल्यामुळे ही जागा ज्या उद्देशासाठी देण्यात आली त्या उद्देशाकरीता वापरली जात नसल्याची बाब माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागा रिक्त करण्याकरीता जिल्हाधिकारी, भंडारा यांनी आदेश देऊनही कोणतीही कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी भंडारा यांनी वाहतुकीचा अडथळा दूर करण्याकरीता दिनांक २४/०२/२०१२ रोजी भंडारा शहरातील शीट क्र. ५४ प्लॉट क्र.२०/४ मधील दीड एकर जागा ठोक भाजीपाला या प्रयोजनासाठी विकसित करण्याचे नगरपालिकेस कळविले होते. त्यानुसार निविदा मंजूर करुन सदर जागा श्री.बंडू तानाजी बारापात्रे यांना विकसित करण्याकरीता कार्यादेश देण्यात आले होते. दरम्यानच्या कालावधीत जिल्हाधिकारी भंडारा यांनी दिनांक ११/०८/२०१६ रोजी सदर जागेचा बाजार

विकसीत करण्याबाबतचा वापर बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यावर विकासकाने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन दिनांक २२/०९/२०१६ रोजी स्थगिती आदेश प्राप्त करुन घेतले आहेत. त्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई रोड (जि.पालघर) रेल्वे स्थानकाच्या बाहेर बेकायदेशीर व्यापारी संकुल बांधल्याबाबत

**(२७) ३७३३१ (०४-०१-२०१८). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई रोड (जि.पालघर) रेल्वे स्थानकाच्या बाहेर रेल्वेच्या मालमत्तेमध्ये पश्चिम बाजूस ८ माळयाचे व्यापारी संकुल मौजे नवघर ३८ ब च्या शासकीय दस्ताऐवजात बेकायदेशीर बदल करुन व रेल्वे अधिकाऱ्यांच्या संगनमताने बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रारी करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर जागेमध्ये तत्कालीन नियोजन प्राधिकरण सिडको यांनी दिनांक १०/१०/२००७ रोजी बांधकाम परवानगी दिली असल्याचे दिसून येते.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर जागेमध्ये सुधारीत विकास परवानगी तसेच सदर इमारतीस भोगवटा दाखला दिलेला आहे.

मा.श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी मा.मुख्यमंत्री महोदय उद्देशुन लिहिलेल्या पत्राच्या अनुषंगाने याबाबतची वस्तुस्थिती दिनांक १७/०२/२०१७ रोजी कळविली आहे.

तसेच काही नागरिकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांना वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात बीएलओचे काम नाकारल्यामुळे शिक्षकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत

**(२८) ३७६९९ (०६-०४-२०१८). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मतदार यादी अद्यावत करण्यासाठी सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान विशेष मोहीम राबविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामासाठी अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी तसेच शिक्षक व तहसिल कार्यालयातील कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बीएलओचे काम नाकारल्यामुळे शिक्षकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शिक्षकांना प्रत्यक्ष मतदान कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कामे लावू नयेत असे मा.सर्वोच्च न्यायालय यांनी आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही, शिक्षकांना सुट्टीच्या दिवशी व शैक्षणिक कामाच्या तासांव्यतिरीक्त मतदार यादी पुनरिक्षण आणि निवडणुक विषयक कामे देण्यात यावीत. असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत.

(५) सदर बाब ही राज्य शासनाच्या अखत्यारीतील नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेला स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी निधी देण्याबाबत**

**(२९) ३७७०८ (०६-०४-२०१८). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेला स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत काम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती टक्के निधी केंद्र शासन व किती टक्के निधी राज्य शासन देणार आहे,

(३) असल्यास, उक्त निधीतून स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत कोणकोणती कामे करण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, नागपूर महानगरपालिकेमार्फत स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत आतापर्यंत कोणती कामे करण्यात आली आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

- केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नागपूर शहराची चॅलेंज प्रक्रियेद्वारे दुसऱ्या फेरीत निवड झाली असून योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केंद्र शासनाकडून ५०% व राज्य शासनाकडून २५% निधी प्राप्त होणार आहे.

(३)

- उक्त योजनेंतर्गत क्षेत्राधिष्टित (एरिया बेस्ड डेव्हलपमेंट प्रकल्प) प्रकल्प व पॅन सिटी प्रकल्प मिळून एकूण २६ प्रकल्प प्रस्तावित आहेत.
- क्षेत्राधिष्ठीत विकास या घटकातंर्गत पारडी, पुनापूर, भरतवाडा, व भांडेवाडी या भागात नगररचना परियोजना राबविणे प्रस्तावति आहे.
- पॅन सिटी प्रकल्पातंर्गत नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी प्रकल्प राबविणे प्रस्तावित आहे.

(४)

- क्षेत्राधिष्ठीत विकास या घटकांतर्गत प्रारूप नगर रचना परियोजना तयार करण्यात आली आहे. सदर नगररचना परियोजनेस राज्य शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर या भागात पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण योजना, क्रीडांगण, उद्याने, शाळा, रूग्णालय इ. विविध प्रकल्प राबविणे प्रस्तावित आहे.
- पॅन सिटी प्रकल्प या घटकांतर्गत नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्यात येत असून त्या अंतर्गत खालील कामे जवळजवळ पूर्ण झाली आहेत.

  १) नागपूर सिटी कम्युनिटी नेटवर्क.
  २) यूनिफाईड ऑपेरेशन ॲण्ड कमांड आणि कंट्रोल सेन्टर.
  ३) प्रकल्प "अभय" (सिसिटीव्ही प्रकल्प).
  ४) वायफाय हब्स.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कार्यालयात अनुकंपा तत्वावरील पदे भरण्याबाबत

**(३०) ३७८१० (०६-०४-२०१८). श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कार्यालयात अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णयानुसार रिक्त होणाऱ्या पदांच्या ५० टक्के, २५ टक्के व २५ टक्के अशा तीन वर्षात पदे भरण्याचा निर्णय रद्द केल्याने शासकीय कार्यालयातील अनुकंपा तत्वावरील प्रतिक्षा यादी वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पुनर्विचार करुन रिक्त होणाऱ्या पदांच्या ५० टक्के, २५ टक्के व २५ टक्के ३ वर्षात अनुकंपा तत्वावरील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांची संख्या कमी करण्याचा उद्देश विचारात घेऊन शासन निर्णय, सा.प्र.वि., दिनांक २३/०४/२००८ अन्वये प्रतीक्षासूचीवर असलेल्या दिनांक २२/०८/२००५ पूर्वीच्या उमेदवारांना शासकीय कार्यालयात रिक्त असलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती तीन वर्षात टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला. तीन वर्षात टप्प्याटप्प्याने नियुक्ती करताना दिनांक २२/०८/२००५ पूर्वीच्या प्रतीक्षायादीतील उमेदवारांपैकी ५०% उमेदवारांची नियुक्ती पहिल्यावर्षी, २५% उमेदवारांची नियुक्ती दुसऱ्या वर्षी व उर्वरित २५% उमेदवारांची नियुक्ती तिसऱ्या वर्षी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

सदर शासन निर्णयातील तरतुद ही केवळ दिनांक २२/०८/२००५ पूर्वीच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांसाठीच होती. त्यानुसार दिनांक २२/०८/२००५ पूर्वीच्या उमेदवारांना तीन वर्षात टप्प्याटप्प्याने नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांची संख्या कमी करण्यासाठी शासन निर्णय, सा.प्र.वि., दिनांक ०३/०५/२०१७ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% ची मर्यादा २ वर्ष वाढविण्याबाबत (दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत) निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय, सा.प्र.वि., दिनांक १५/०२/२०१८ अन्वये पदभरतीवरील असलेले निर्बंध विचारात घेता प्रस्तुत निर्बंध असेपर्यंत गट-क व गट-ड

संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. तसेच सदर २०% ची मर्यादा ही दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत लागू आहे.

---

## कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळणेबाबत

**(३१) ३७८११ (०६-०४-२०१८). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७९६ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेत दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास समाविष्ट करण्यात आलेल्या २७ ग्रामपंचायतीच्या ४९९ सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे किंवा किमान वेतन कायदयाप्रमाणे वेतन देण्यात येत नसल्याने त्यांनी प्रशासनाच्या निषेधार्थ कामबंद आंदोलन करण्याचा इशारा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे समान काम समान वेतन या धोरणाप्रमाणे ग्रामपंचायतीसहित सरसकट सर्व कर्मचाऱ्यांना समान वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनामार्फत किमान वेतनासंदर्भात सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार २७ गावातील ४९४ कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्याबाबत सर्वसाधारण सभेने दिनांक ०५/१०/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने दिनांक ०५/१२/२०१७ पासून २७ गावातील ४९४ कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आलेले आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे महापालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोबाईल नेटवर्क कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३२) ३७८४१ (०६-०४-२०१८). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयडिया, एअरटेल, वोडाफोन व रिलायन्स जिओ या मोबाईल कंपन्याबरोबरच इतर सर्व कंपन्यांकडे पुरेसे टॉवर्स नसल्याने कंपन्याच्या नेटवर्कमध्ये अडथळे निर्माण होऊन मोबाईलवर बोलताना अचानक कॉलड्रॉप होण्याचे प्रमाण वाढलेले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच टॉवरवर अनेक कंपन्यांचे नेटवर्क सुरु असल्याने नेटवर्कची गर्दी होऊन सतत कॉलड्रॉपसारखे प्रकार घडवून आणणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी असा इशारा “टेलिकॉम अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया” ने देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोबाईलवर बोलताना अचानक कॉलड्रॉप होण्याचा प्रकार कमी व्हावा याकरीता राज्य शासनाने पुढाकार घेऊन याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,
(४) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही. अशा रितीची कोणतीही तक्रार माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडे प्राप्त नाही.
(२) हे खरे नाही. टेलीकॉम रेग्युलेटरी ऑथॉरिटी ऑफ इंडिया (TRAI) यांचेकडून कोणतेही आदेश माहिती तंत्रज्ञान संचालनालयास प्राप्त नाहीत.

(३) व (४) मोबाईलवर बोलतांना अचानक कॉलड्रॉप होण्याचा प्रकार कमी व्हावा याकरीता दुरसंचाराचे उत्कृष्ट नेटवर्क असणे आवश्यक आहे. राज्यात दुरसंचाराचे भक्कम व गुणवत्तापूर्ण नेटवर्क निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने पुढाकार घेतला असून केंद्र शासनाच्या दुरसंचार धोरणाशी सुसंगत धोरण दिनांक १७/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमीत केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील अजनी रेल्वे पूलाची दुरूस्ती करणेबाबत**

**(३३) ३८१०३ (०६-०४-२०१८). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील विशेषत: अजनी रेल्वे पूल हा ब्रिटीशकालीन १५०-१६० वर्षापूर्वीचा पूल जीर्ण होत असल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ब्रिटीशकालीन जीर्ण पूलाच्या दुरूस्तीकरीता शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नागपूर शहरातील अजनी रेल्वे पूल हा ८८ वर्षापूर्वी बांधण्यात आलेला असून, सदर पूलाची स्थिती योग्य असल्याचे, वरिष्ठ विभागीय अभियंता (सीटीएल), मध्य रेल्वे नागपूर यांनी दिनांक ३१/०१/२०१८ च्या पत्रान्वये कळविल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

## पुणे शहराच्या स्मार्ट सिटी योजनेच्या भाग भांडवलात वाढ करण्याबाबत

**(३४) ३८२३४ (०६-०४-२०१८). ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या स्मार्ट सिटी योजनेच्या भाग भांडवलात वाढ करण्याचा निर्णय संचालक मंडळाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनीचे सुरवातीचे भागभांडवल हे रुपये १८५.९५ कोटींनी वाढवण्याचा निर्णय दिनांक ०४/१२/२०१७ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेतला आहे.

केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेच्या मार्गदर्शक तत्वानांनुसार स्मार्ट सिटी योजनेंतर्गत गठीत करण्यात आलेल्या विशेष उद्बेश वाहनाचे सुरवातीचे भागभांडवल हे रुपये ३८४ कोटींपर्यंत वाढवण्यास मुभा आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दुसऱ्या महायुध्दातील माजी सैनिक व विधवा पत्नी यांना मिळत असलेल्या निवृत्ती वेतनात/कुटुंब वेतनात वाढ करण्याबाबत

**(३५) ३८२९१ (०७-०४-२०१८). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यात दुसऱ्या महायुध्दातील माजी सैनिक व विधवा पत्नी यांना मिळत असलेल्या निवृत्ती वेतनात/कुटुंब वेतनात वाढ करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अर्ज करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.१७/का.२८, दिनांक ८/२/२०१६ नुसार संबंधित विभागास अर्ज प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णय क्र. संकिर्ण २००८/प्र.क्र २८/९/२००८ दिनांक १३ मे, २०११ नुसार दुसऱ्या महायुध्दातील लाभार्थीसाठी माहे मे, २०११ पासून रुपये ३०००/- प्रमाणे अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यात वाढ करुन प्रतिमाह रुपये ६०००/- करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मागील एक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०५-२०१८)** : (१), (२), (३) व (४) होय खरे आहे.

(५) माजी सैनिक / त्यांच्या विधवांना दुसरे महायुध्द अनुदान दर महा रुपये ३०००/-अर्थसहाय्य देण्याबाबत मा.मंत्रिमंडळात निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये सुधारणा करावयाची असल्यास, सदर बाब मंत्रिमंडळाच्या निर्देशनास आणणे आवश्यक आहे.

माजी सैनिक /त्यांच्या विधवांना दिले जाणारे दुसरे महायुध्द अनुदान दर महा रुपये ३०००/- अर्थसहाय्य इतर राज्यांच्या तुलनेत पुरेसे आहे.

प्रस्तावित केल्यानुसार अर्थसहाय्यात वाढ केल्यास सन २०१७-२०१८ करीता ४१४३ लाभार्थीकरीता राज्य शासनावर रुपये १०.७४ कोटी इतका अतिरिक्त वार्षिक भार अपेक्षित आहे.

राज्याच्या सध्याच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने रुपये १०.७४ कोटी इतका अतिरिक्त वार्षिक भार तसेच आर्थिक वर्ष संपण्याकरीता राहिलेला अल्प कालावधी विचारात घेता विभागाने इतर राज्यांकडून देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याचा तुलनात्मक विचार करुन पुढील आर्थिक वर्षात प्रस्ताव फेर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन इतर राज्यांद्वारे देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची माहिती एकत्रित करण्यात येत असून त्याबाबतचा तुलनात्मक विचार करुन सदर प्रस्ताव फेर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बहुसंख्य नगरपालिका शिक्षण मंडळाच्या निवडणुका प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ३८८५२ (०६-०४-२०१८). डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुसंख्य नगरपालिका शिक्षण मंडळाच्या निवडणुका मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपालिका शिक्षण मंडळाच्या निवडणुका घेण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) असल्यास, मूळ कायद्यानुसार लोकनियुक्त शिक्षण मंडळ अस्तित्वात नसताना नगरपालिकेच्या नगराध्यक्षांकडे स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१८) :** (१) व (२) मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण,हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण निरसन अधिनियम, २०१३ नुसार उक्त अधिनियमान्वये गठीत केलेली शिक्षण मंडळे विर्सजित करण्यात आली

आहेत. सदर निरसन अधिनियम लागू करतेवेळी जी शिक्षण मंडळे गठीत झाली होती ती त्यांची मुदत संपेपर्यंत कार्यरत राहणार आहेत.

यामुळे नगरपालिका शिक्षण मंडळाच्या निवडणूका घेण्याचा अथवा प्रलंबित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ३१/१२/२०१३ अन्वये महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी नगरपालिका यांना विविध शाळांबाबत कार्यवाही करता सक्षम अधिकारी घोषित केले आहे.

शिक्षण विषयक अधिकार व जबाबदाऱ्या नगराध्यक्ष यांना देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## पाटण (ता.कराड, जि.सातारा) येथील मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत

**(३७) ३८८८६ (०६-०४-२०१८). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (ता.कराड, जि.सातारा) येथील मतदार यादी भाग क्र. ३४५ व ३४६ मध्ये माहे मे व जुलै, २०१७ या कालावधीत मतदार नोंदणी अभियानात मतदारांनी आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याकरीता व चुकीची नावे दुरुस्त करण्यासाठी तसेच मयत झालेल्या मतदारांची नावे कमी करण्यासाठी सरपंच यांनी संबंधितांकडे वारंवार लेखी पत्राद्वारे मागणी करण्यात येवूनही अद्याप याबाबत तहसिलदार, पाटण यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार मागणी करण्यात येऊनही जाणीवपूर्वक कार्यवाही करण्यास विलंब करणाऱ्या तहसिलदारावर कारवाई करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) नाही,
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या सेवेतील रिक्त पदांबाबत

**(३८) ३८९४७ (०६-०४-२०१८). श्री.कपिल पाटील : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ३२६६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सेवेतील १,७७,००० पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत खातेनिहाय वस्तुस्थिती व तपशील काय आहे,
(३) असल्यास, रिक्त पदांच्या भरतीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे काय व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) सर्व प्रशासकीय विभांगाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिनांक ३१/१२/२०१६ अखेर १,३०,५७९ इतकी शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे.
(२) याबाबत प्रशासकीय विभागांच्या सचिवनिहाय प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | विभाग | रिक्त पदे |
|---|---|---|
| १-अ | गृह विभाग (अ.मु.स.) | १८३०७ |
| १-ब | गृह विभाग (प्रधान सचिव (अ.व सु.) | १०४७ |
| १- क | गृह विभाग (प्र.स. (रा.उ.शु.) | १००१ |
| १-ड | गृह विभाग (प्र.स. परिवहन, बंदरे) | २२३० |

| | | |
|---|---|---|
| १-इ | गृह विभाग प्र.स. (विशेष) | ५८० |
| २ | सार्वजनिक आरोग्य विभाग | १८३५८ |
| ३ | जलसंपदा विभाग | १४५३४ |
| ४-अ | कृषी व पदुम विभाग (कृषी) | ७९२६ |
| ४-ब | कृषी व पदुम विभाग (पदुम) | ४१३९ |
| ५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ३२२१ |
| ६-अ* सप्टेंबर २०१६ ची माहिती | महसूल व वन विभाग (महसूल) | ६३९१ |
| ६-ब | महसूल व वन विभाग. (वने) | २९७१ |
| ६-क | महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) * | ६४२ |
| ७ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ६४९० |
| ८-अ | वित्त विभाग. प्र.सचिव (व्यय) | ४७९७ |
| ८-ब | वित्त विभाग. सचिव (ले.व को.) | १४९० |
| ९ | आदिवासी विकास विभाग | ६३४९ |
| १० * सप्टें. २०१६ ची माहिती | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ३२८० |
| ११ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ५२०० |
| १२-अ | स.प.व व. विभाग (सहकार, पणन) | २९२५ |
| १२-ब | स.प.व व. विभाग, (वस्त्रोद्योग) | १०४ |
| १३ * सप्टें. २०१६ ची माहिती | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. | २४४७ |
| १४-अ | उ.ऊ.व का. विभाग (उद्योग) | १८४० |
| १४-ब | उ.ऊ.व का. विभाग (कामगार) | १११३ |
| १५ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १८९० |
| १६ | पाणी, पुरवठा व स्वच्छता विभाग | ६०६ |
| १७ | महिला व बालविकास विभाग. | १२५७ |

| | | |
|---|---|---|
| १८ | विधी व न्याय विभाग. | ९१३ |
| १९-अ | नगरविकास विभाग (न.वि.१) | ५५८ |
| १९-ब | नगरविकास विभाग (न.वि.२) | १७० |
| २० | नियोजन विभाग. | ४८९ |
| २१ | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | ४६५८ |
| २२ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | १०७ |
| २३ | पर्यटन व सां.का. विभाग. | ३०६ |
| २४ | सामान्य प्रशासन विभाग /अ.मु.स.(सेवा) सर्व सचिव एकत्रित माहिती | १८६० |
| २५ * सप्टें. २०१६ ची माहिती | गृहनिर्माण विभाग. | ३१२ |
| २६ | अल्पसंख्याक विकास विभाग. | १२ |
| २७ * सप्टें. २०१६ ची माहिती | पर्यावरण विभाग. | २ |
| २८ | मराठी भाषा विभाग. | ५७ |
| | एकूण रिक्त पदे | १३०५७९ |

(३) व (४) दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वसाधारण तत्व पाळणे आवश्यक आहे. तसेच, केंद्र शासनाच्या धर्तीवर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन सुधारणा करण्याचा निर्णय झाल्यास वेतनावरील खर्चात संभाव्य वाढ विचारात घेऊन नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती यावर नियंत्रण आणण्याचा निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये पदभरतीवर काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आले आहेत.

याखेरीज वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २५/०५/२०१७ नुसार जे प्रशासकीय विभाग सेवार्थ/ शालार्थ प्रणालीतील मंजूर पदसंख्येत असलेली तफावत व इतर त्रुटी दूर करुन, आकृतिबंध नव्याने अंतिम करुन घेतील, त्याच विभागांना वित्त विभागाच्या दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तसेच, तद्नंतरच्या दिनांक २३/०९/२०१५, दिनांक १७/११/२०१५ आणि दिनांक १५/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार पदभरतीस मुभा देण्यात आलेली आहे व जे प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच, पदभरती करता येणार नाही. तसेच, तोपर्यंत पदे रुपांतरित करता येणार नाही, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

असे जरी असले तरी पदोन्नतीच्या वाट्याची पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणाऱ्या विभागांना पदे भरण्याची मुभा आहे. याशिवाय विधिमंडळात आश्वासित केल्यानुसार विविध विभागातील सरळसेवेची एकूण ३६,००० पदे भरण्यास मान्यता देण्याची आवश्यक कार्यवाही वित्त विभागाकडून करण्यात येत आहे.

---

**नाशिक शहरातील गोदावरी नदीपात्र प्रदुषण मुक्त करणेबाबत**

**(३९) ३९४६५ (०६-०४-२०१८). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ३१८०१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील गोदावरी नदीपात्र प्रदुषण मुक्त करण्याबाबतच्या दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे झालेल्या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त, नाशिक यांनी महानगरपालिकेस दिलेल्या आदेशानुसार गोदावरी नदीपात्र प्रदुषण मुक्त करण्याचा आराखडा महानगरपालिकेकडून विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या मलनिःस्सारण केंद्राच्या क्षमता वाढीसाठी तसेच महानगरपालिका क्षेत्रातुन वाहणारे संपूर्ण गोदावरी नदीपात्र प्रदुषण मुक्त करण्यासाठी सादर केलेल्या आराखड्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, गोदावरी नदी स्वच्छतेसाठी महानगरपालिकेमार्फत काढण्यात आलेल्या निविदेसंबंधीची प्रगतीत असलेली प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, कन्नमवार पुल ते लक्ष्मीनारायण पुलादरम्यानच्या घाटाची जागा विकासकासाठी महानगरपालिकेस वर्ग करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) असल्यास, गंगा नदीच्या धर्तीवर गोदावरी नदीच्या प्रवाहात महानगरपालिका क्षेत्रात जलप्रदुषण मापक यंत्रे बसविण्याबाबत व संपूर्ण नदीपात्र प्रदुषणमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय.

(२) महानगरपालिकेने सादर केलेल्या आराखड्यात समाविष्ट गंगापूरगांव येथे १८ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे व पिंपळगांव खांब येथे ३२ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र बांधण्यासाठी शासनाच्या अमृत योजनेंतर्गत अनुक्रमे रुपये २८.७९ व ५३.४६ कोटी रक्कमेस मंजुरी देण्यात आली असून, प्रत्यक्षात जागेवर कामे सुरु करण्यात आली आहेत.

(३) गोदावरी नदीतील पाणवेली काढण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

(४) सदर प्रस्ताव कार्यवाहीत आहे.

(५) गंगा नदीच्या धर्तीवर गोदावरी नदीच्या प्रवाहात महानगरपालिका क्षेत्रात जलप्रदुषण मापक यंत्रे बसविणे या कामाची निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातून महत्त्वाच्या नस्ती गहाळ झाल्याबाबत

**(४०) ३९५९९ (०६-०४-२०१८). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातून कंत्राटी डॉक्टर व परिचारिकांच्या नियुक्तीबाबतची महत्त्वाची नस्ती गहाळ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेच्या याच विभागातून अशा प्रकारे यापूर्वीही महत्त्वाच्या नस्ती गहाळ झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महत्त्वाच्या नस्ती गहाळ होण्यामागील कारणांचा शोध महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महापालिकेच्या आरोग्य विभागाशी संबंधित नस्ती अभिप्रायासाठी महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झालेली होती. परंतु सदरची नस्ती अनावधानाने इतर नस्त्याबरोबर बांधली गेल्याने, सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित राहिल्याचे निदर्शनास आलेले आहे.

---

## राज्यातील धर्मादाय संस्था अकार्यक्षम असल्याबाबत

**(४१) ३९७२२ (०६-०४-२०१८). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ६० हजारांहून अधिक धर्मादाय संस्था अकार्यक्षम असल्याचे व नियमबाहय कृती करीत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांचेविरुध्द माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थांची विभागनिहाय संख्या काय आहे व त्यांचेकडून कोणत्या स्वरुपाची नियमबाहय कृती झाली आहे,

(३) असल्यास, उक्त संस्थांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील सुधारित कलम २२ (३अ) नुसार कार्यवाही करण्यात आली असून, यासोबत विभागनिहाय तक्ता जोडीत आहे. तसेच अकार्यरत संस्था स्वयंखुद बदल अर्जाद्वारे रद्द करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे व यापुढेही चालूच राहिल.

(३) अकार्यरत संस्था स्वयंखुद बदल अर्जाद्वारे रद्द करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. रद्द करण्यात आलेल्या संस्थांची विभागनिहाय माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील सुधारित कलम २२ (३अ) नुसार कार्यवाही चालूच राहिल.

---

## आपले सरकार सेवा केंद्रावर पतंजली या खाजगी कंपनीच्या उत्पादन विक्रीबाबत

**(४२) ३९७४८ (०६-०४-२०१८). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाने ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणावर “आपले सरकार सेवा केंद्र” स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून त्यासंदर्भातील परिपत्रक काढले असून तद्नुसार प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत आणि महानगरपालिकांमध्ये अशी केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांसह पतंजली सारख्या खाजगी कंपनीची उत्पादने विकण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त काढण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये विक्रीस ठेवण्यात येणाऱ्या उत्पादनांमध्ये पतंजलीच्या उत्पादनांशिवाय इतर एकाही खाजगी उत्पादकांचा उल्लेख करण्यात आला नसल्याने या निर्णयाला अनेक उद्योजकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार पतंजली या खाजगी कंपनीची उत्पादन विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१८ नुसार आपले सरकार सेवा केंद्राबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाचा मुख्य उद्देश सध्या असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढवून प्रामुख्याने शहरी भागात अधिक केंद्रे स्थापन करण्याचा आहे. शासनाच्या सर्व G२C (Government to Citizen) सेवा आपले सरकार सेवा केंद्रामार्फत देण्यात येणार आहेत. तसेच सदर केंद्रांमधून B२C (Business to Citizen) सेवा देता येईल. केंद्र शासनाच्या CSC २.० मार्गदर्शक सूचनांनूसार B२C सेवासाठी CSC-SPV ही संस्था अंमलबजावणी यंत्रणा राहील. त्यामुळे, त्यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व B२C सेवा या सदर शासन निर्णयातील परिशिष्ट - "क" मध्ये दर्शवण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील "परिशिष्ट-क" मधील माहिती केंद्र शासनाच्या CSC-SPV च्या csc.gov.in/implementationguidelines या संकेतस्थळावर नमूद माहिती आहे तशी दर्शवण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या CSC-SPV मार्फत त्यांच्या संकेतस्थळावर दर्शविलेले सर्व B२C सेवा- उदाहरण- पतंजली, L& T courses, Tally, Coaching (IIT ect.) बाबत उल्लेख आहे. सदर यादी फक्त सूचक पध्दतीची असून CSC-SPV मार्फत भविष्यात देण्यात येणाऱ्या इतर B२C सेवा ही आपले सरकार सेवा केंद्रामार्फत देण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्मार्ट सिटी योजनेबाबत

**(४३) ३९९२४ (०६-०४-२०१८). ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने देश पातळीवर स्मार्ट सिटी योजना अंमलात आणून तीन वर्षापूर्वी तीन टप्प्यात त्यामध्ये राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती, सोलापूर, कल्याण-डोंबिवली व औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रातील शहराची निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या निकषानुसार निवड झालेल्या या स्मार्ट शहरांसाठी ५ वर्षांच्या कालावधीकरीता केंद्र शासनाकडून प्रतिवर्ष/प्रतिशहर १०० कोटी रुपये असे एकूण ५०० कोटी तर राज्य शासन व महानगरपालिकास प्रत्येकी ५० कोटी प्रमाणे २५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती महानगरपालिकांकडून किती रक्कमेचे स्मार्ट सिटी प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आले आहेत व केंद्र शासनाकडून तसेच राज्य शासनाकडून त्याकरीता आतापर्यंत किती अनुदान (महानगरपालिकानिहाय) प्राप्त झाले आहे,

(४) असल्यास, त्याचप्रमाणे ठाणे महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून स्मार्ट योजना अंमलबजावणीकरीता गेल्यावर्षी २०० कोटी रुपये प्राप्त होवून केवळ ७ कोटी रुपयेच आतापर्यंत खर्च होऊन एकही प्रकल्प पूर्ण झाला नसल्याचे तसेच त्यासाठी दोनदा सल्लागार नेमल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजना सन, जून २०१५ मध्ये सुरु केली असून मागील तीन वर्षात तीन टप्प्यात राज्यातील पुणे, सोलापूर, नाशिक, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, ठाणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड या आठ शहरांची निवड चॅलेंज प्रक्रियेद्वारा स्मार्ट शहर म्हणून विकसित करणेकामी करण्यात आलेली आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३)

- केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत राबविलेल्या चॅलेंज प्रक्रियेमध्ये सहभागी होणेकामी राज्य शासनाने दहा शहरांची शिफारस केंद्र शासनाकडे केली होती. यामध्ये आतापर्यंत झालेल्या चार फेऱ्यांमिळून, नऊ शहरांनी आपले प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केले होते. त्यापैकी आठ शहरांची निवड केंद्र शासनाने केली आहे.

- सद्य:स्थितीत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत वरील आठ शहरांमध्ये एकूण रुपये २१५४२.४५ कोटी इतक्या किमतीचे एकूण ३०३ प्रकल्प राबविण्यात येत आहेत.
- सदर योजनेंतर्गत माहे एप्रिल २०१८ अखेरपर्यत केंद्र शासनाकडून रुपये १३६० कोटी रुपये व राज्य शासनाकडून त्याप्रमाणात रुपये ६८० कोटी (पुणे व सोलापूर साठी प्रत्येकी रुपये २९४ कोटी, नाशिक, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, ठाणे, नागपूर या पाच शहरांसाठी प्रत्येकी रुपये २८५ कोटी आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी रुपये २७ कोटी) इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

४)

- केंद्र शासन व राज्य शासनाने स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ठाणे महापालिकेस माहे एप्रिल २०१८ अखेरपर्यंत रुपये २९४ कोटी इतका निधी वितरित केला आहे.
- स्मार्ट सिटी योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ठाणे स्मार्ट सिटी ल. अंतर्गत क्षेत्राधारीत विकास प्रकल्पासाठी मे. क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची माहे जानेवारी,२०१८ रोजी आणि पॅन सिटी उपक्रमासाठी मे. पॅलेडियम कंसल्टींग इंडिया प्रा. लि. यांची माहे जानेवारी,२०१८ रोजी विहित प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
- सद्य:स्थितीत ठाणे येथे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत एकूण २६ प्रकल्प राबविण्यात येत असून माहे एप्रिल २०१८ अखेर यापैकी रुपये २.१९ कोटी किंमतीचे ३ प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. याव्यतिरिक्त योजनेंतर्गत माहे एप्रिल-२०१८ अखेरपर्यंत विविध विकास प्रकल्पांसाठी रुपये २८.७० कोटी खर्ची पडलेले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(४४) ४००४८ (०६-०४-२०१८). श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर महानगरपालिका आयुक्त, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार कारवाई करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महानगरपालिका क्षेत्रातील किती अनधिकृत हॉटेल्स व लॉजिंग-बोर्डिंगवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल व लॉजिंग व्यवसायाच्या ठिकाणी विभागस्तरावर प्रत्यक्ष तपासणी करून सदर ठिकाणी अनधिकृत बाधकामे आढळून आले असल्याने १९९ व्यवसायिकांना एम.आर.टी.पी. ॲक्ट, १९६६ मधील कलम ५३(१) अन्वये नोटीसा बजावून ८३ व्यवसाय धारकांवर बांधकाम निष्कासनाची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील अमृत योजनेंतर्गतच्या कामांबाबत

**(४५) ४०३४५ (०६-०४-२०१८). श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात अमृत योजनेंतर्गत करावयाची बहुतांश कामे सध्या अर्धवट स्थितीत असल्याने जिल्हयाचा विकास खुंटला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमृत योजनेंतर्गत अर्धवट असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१), (२) व (३)

- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सोलापूर जिल्हयातील सोलापूर शहरासाठी रुपये ५५१.८८ कोटी किंमतीचे ३ प्रकल्प व बार्शी शहरासाठी रुपये ११२.४० कोटी किंमतीचा १ प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.
- सोलापूर शहरासाठी मंजूर ३ प्रकल्पांपैकी पाणीपुरवठा टप्पा-१ या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून उर्वरित पाणीपुरवठा टप्पा-२ व मलनिस्सारण प्रकल्प निविदाधीन आहेत.
- बार्शी शहर मलनिस्सारण प्रकल्पाचे कार्यादेश एप्रिल, २०१८ मध्ये देण्यात आले असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
- या व्यतिरिक्त उपरोक्त २ शहरात ६ हरित क्षेत्र विकास प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.
- अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांची कामे विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना अभियान शहरांना देण्यात आल्या असून त्यानुषंगाने शासन स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

---

## राज्यातील विविध कौटुंबिक न्यायालयातील दावे प्रलंबित असल्याबाबत

**(४६) ४०५५५ (०६-०४-२०१८). ॲड.जयदेव गायकवाड, प्रा.डॉ.तानाजी सावंत, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध कौटुंबिक न्यायालयामध्ये ३४,३५९ दावे सध्या प्रलंबित असून पुणे व मुंबईतील वांद्रे येथील कुटुंब न्यायालयात सर्वाधिक दावे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ ते १० वर्षापेक्षा जास्त वर्षे प्रलंबित असलेल्या दाव्यांपैकी फौजदारी व दिवाणी स्वरुपाचे प्रत्येकी किती दावे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) दिनांक ३१/३/२०१८ अखेर कौटुंबिक न्यायालयामध्ये एकूण-३६,०९६ दावे प्रलंबित असून त्यापैकी मुंबई येथे एकूण- १८५४ व पुणे येथे एकूण- ११५४ दावे प्रलंबित आहेत.

(२) ५ ते १०वर्षापेक्षा जास्त वर्षे प्रलंबित असलेल्या दाव्यांपैकी फ़ौजदारी व दिवाणी स्वरुपाचे दाव्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| कौटुंबिक न्यायालय | १० वर्षापेक्षा जास्त (दिनांक ३१/०३/२०१८ अखेर) | | | ५ वर्षापेक्षा जास्त व १० वर्षापेक्षा कमी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिवाणी | फ़ौजदारी | एकूण | दिवाणी | फ़ौजदारी | एकूण |
| मुंबई | ८ | ० | ८ | २५४ | ५९ | ३१३ |
| पुणे | ५ | १ | ६ | १०५ | २२ | १२७ |

(३) प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने सक्रीय कृती योजना तयार केली असून सदर कृती योजनेमुळे जुनी प्रकरणे निकाली काढ़ली जावुन दाव्यांची संख्या कमी होत आहे. तसेच, जुनी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय यांना प्रत्येक महिन्यासाठीचा विशेष कार्यक्रम दिला गेला आहे.

मा.उच्च न्यायालय जुनी प्रकरणे निकाली काढण्याच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवून असल्यामुळे जुन्या प्रलंबित प्रकरणांची संख्या हळूहळू कमी होत आहे.

मा.उच्च न्यायालयाने प्रमुख जिल्हा न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश, शहर दिवाणी न्यायालय/ मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालय/ मुख्य न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय यांना महिलांना न्याय मिळण्याची खात्री करण्यासाठी प्राथमिकता असलेल्या अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी व वेळेवर वितरण सुकर होण्यासाठी वारंवार शक्य तितक्या लवकर वसुलीसाठी व वॉरंटसची अंमलबजावणी करण्याच्या प्रकरणाशी सुसंगत करणेबाबत दिशानिर्देश जारी केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील मिहान प्रकल्पातील कंपन्या सुरु करण्याबाबत

**(४७) ४०६५४ (०६-०४-२०१८). श्री.नागोराव गाणार : दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३१३६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पाच्या विकासावर राज्य शासन अधिक भर देत असतानाही काही कंपन्यांनी अनेक वर्षापासून कामे सुरु केली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डीएलएफ, सोनी पॅमीमर्स, मॅक्स एमरोस्पेस व लिला वेंचर्स तसेच आतापर्यंत कुठल्याही कंपनीकडून एमआयडीसी जवळ याप्रकारचा प्रस्ताव पाठवण्यात आला नाही तसेच या कंपन्यांना एमआयडीसीकडून काम न सुरु केल्याबद्दल नोटीसा ही पाठवण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिहान प्रकल्पातील कंपन्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) ज्या कंपन्यांनी फक्त अनामत रकमेचा किंवा अपूर्ण रकमेचा भरणा केला आहे, अशा कंपन्यांना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून उरलेली रक्कम त्वरीत भरण्यासाठी स्मरणपत्रे देण्यात आली आहेत. तसेच, ज्यांनी पूर्ण रक्कम भरली आहे, त्यांना उद्योग उभारण्याची कार्यवाही करण्याबाबत नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. त्यानुसार, सोनी पॉलीमर्स, डीएलएफ, एच.सी.एल., डसॉल्ट रिलायन्स, पतंजली, इंदमार, हल्दीराम, इ. कंपन्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून उद्योग उभारणीस सुरुवात केली आहे. मॅक्स एरोस्पेस व लिला वेंचर्स या कंपन्यांनी उद्योग उभारणीबाबत कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही. तथापि, सदर कंपन्यांनाही स्मरणपत्रे देण्यात आली आहेत.

मिहान प्रकल्पात उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहित करणे उद्देश असल्याने कंपन्यांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यातून मार्ग काढण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबत

**(४८) ४०६९५ (०६-०४-२०१८). प्रा.डॉ.तानाजी सावंत : दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३४६५२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विविध माध्यमातून पत्रकारीता करीत असलेल्या पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबतच्या निर्णयाला शासनाने तत्वत: मान्यता दिली असल्याची बाब दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबतचे निकष निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व किती कालावधीत लाभार्थी पत्रकारांना निवृत्तीवेतन सुरु होऊ शकते,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१८) :** (१) ते (३) हे खरे नाही.
(४) राज्यातील वयोवृध्द व ज्येष्ठ पत्रकारांसाठी पेन्शन योजनेबाबत कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही.परंतु ज्येष्ठ पत्रकारांप्रती सामाजिक भावनेतून वयोवृध्द व ज्येष्ठ पत्रकारांना त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेंतर्गत दरमहा ठराविक रक्कम देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## पुणे महानगरपालिका मिळकत करावरील थकबाकीच्या रकमेवर दंड आकारल्याबाबत

**(४९) ४१२१४ (०६-०४-२०१८). श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका मिळकत करावरील थकबाकीच्या रकमेवर मोठ्या प्रमाणात दंड आकारत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महानगरपालिका राज्य शासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी, मोठा निवासी कर यावरही मोठ्या प्रमाणात दंड आकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) मिळकत करावरील थकबाकीच्या रकमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती आकारण्यात येते.

(२) महाराष्ट्र शासनाचे शिक्षण कर, व रोजगार हमी अधिनियम १९६२ प्रकरण तीन नियम १० अन्वये शासनाचे शिक्षण कर व रोजगार हमी कराच्या रकमेवर १०% इतकी शास्ती वर्षातून एकदाच आकारण्यात येते.
तथापि, मोठ्या निवासी कराच्या रकमेवर शास्ती आकारण्यात येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद शहराच्या विविध भागात सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(५०) ४४३६४ (३०-०८-२०१३). श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराच्या विविध भागात सांडपाणी उपचार पध्दती प्रकल्प उभारण्याचा निर्णय पालिकेमार्फत घेऊन त्यास शासनामार्फत मान्यता देऊन अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,
(३) तसेच औरंगाबाद शहराच्या विविध भागात सिव्हरेज ट्रिटमेन्ट प्लँन्ट उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (६-०६-२०१८) :** (१) व (२)

- केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत डिसेंबर, २०१३ मध्ये औरंगाबाद शहर भूमिगत गटार योजना मंजूर आहे.
- सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती जुलै, २०१४ मध्ये कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
- सदर प्रकल्पाचे ८६ % काम पूर्ण झाल्याचा अहवाल औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केला आहे.

(३) व (४)

- प्रकल्पांतर्गत एकूण २१६ एमएलडी क्षमतेची ४ मलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात येणार आहेत.
- त्यापैकी, १ मलनिस्सारण केंद्राचे काम पूर्ण, २ केंद्रांचे काम ९८%, तर एका केंद्राचे काम ६% पूर्ण झाल्याचा अहवाल औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केला आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.